वर्धा जिल्हा नियोजन समितीवर
नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती
करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: डिएपी-२०१९/प्र.क्र. ११५ /का.१४८१-अ,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

पहा:- १) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) १९९८,
२) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम २०००
३) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती , वर्धा यांचे पत्र क्र.जिनिस/नानिसनि/का-२/२०१९-२०/११६१, दि. १४/८/२०१९

शासन निर्णय :-

"महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम, क्रमांक ३०/२०००" मधील कलम ३ चा पोटकलम (३) दोन (ब) येथिल तरतूदीनुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्र"अ"मध्ये दर्शविल्याप्रमाणे जिल्हा नियोजन समितीच्या क्षेत्रात वास्तव्य असलेल्या किंवा त्या क्षेत्रातून निवडून आलेल्या संसद सदस्य/विधीमंडळ सदस्यांमधून २ व्यक्तींची "नामनिर्देशित सदस्य" म्हणून वर्धा जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	नामनिर्देशित सदस्याचे नांव	पत्ता
१.	डॉ. पंकज राजेश भोयर,विधानसभा सदस्य	कांचन होम बंगला, सुदामपुरी, नगरपरिषद उद्यानासमोर,जि.वर्धा
२.	श्री. समीर त्र्यंबकराव कुणावार, विधानसभा सदस्य	कृष्णाई, महावीर वॉर्ड, हिंगणघाट, जि.वर्धा

२. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, वर्धा यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

३. जिल्हा नियोजन समितीवर वरील नमूद "नामनिर्देशित सदस्य" यांच्या करण्यात आलेल्या नियुक्त्या पुढील आदेश होईपर्यंत किंवा शासनाकडून सदर नियुक्त्या रद्द होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत अबाधित राहतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१३१५३३३६५८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.09.13 15:43:44 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
५. मा.पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती, वर्धा यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई
७. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर
८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, वर्धा
९. उपआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर विभाग,नागपूर
१०.जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा
११.महालेखापाल, महाराष्ट्रराज्य, मुंबई/नागपूर,
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा
१३.निवडनस्ती, का-१४८१अ